YouTube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | बुधवार, दि. २९ मार्च २०२३ | पृष्ठ | मुल्य : निःशुल्क

# छत्रपतींच्या महाराष्ट्रातील काष्ट आज अयोध्येला रवाना होणार

### शोभायात्रेची जय्यत तयारी, दोन हजार कलावंतांचा सहभाग, कैलाश खेर यांची रामधून : ना. सुधीर मुनगंटीवार आचार्य गोविंद देव गीरी महाराज, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह नामवंतांची उपस्थिती




**चंद्रपूर/ प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील सागवन काष्ठ प्रभू श्रीरामचंद्रांच्या अयोध्येला (बुधवारला) रवाना होणार आहे. रामायणात ज्या दंडकारण्याचा उल्लेख आहे त्या दंडकारण्याचा भाग असलेल्या चंद्रपूरमधील सागवन काष्ठ अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या निर्माण कार्यासाठी वापरले जाणार आहे. हे काष्ठ पाठविण्याचा आनंदोत्सव चंद्रपूर आणि बल्लारशामध्ये उद्या बुधवारी साजरा होणार आहे, अशी माहिती राज्याचे वने व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

या काष्ठपूजन सोहळयाला श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्रचे कोष्याध्यक्ष आचार्य गोविंददेव गीरी महाराज, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, उत्तर प्रदेशचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री योगेंद्र उपाध्याय स्टॅम्प, न्यायालय शुल्क राज्यमंत्री रविंद्र जायस्वाल वन, पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ अरुणकुमार सक्सेना अभिनेते अरुण गोवील, सुनील लहरी, अभिनेत्री दिपीका चिखलिया या सोहळयाला उपस्थित राहणार आहेत.

काष्ठपुजन, शोभायात्रा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची जय्यत तयारी झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास दोन हजार कलावंत सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, असेही ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. दुपारी ३.३० वाजता बल्लारपूर एफडीसीएम डेपोमध्ये काष्ठपुजन होईल. त्यानंतर चंद्रपूर येथील माता महाकाली मंदिरापासून प्रभू श्रीरामाच्या मंदिरापर्यंत शोभायात्रेचे आयोजन होईल. रात्री ९.३० च्या सुमारास चांदा क्लब ग्राऊंड शोभायात्रेचा समारोप होणार आहे. त्यानंतर त्याच ठिकाणी रात्री ९.३० वाजता सुप्रसिद्ध गायक कैलाश खेर यांचा रामधून व राम भजनाचा कार्यक्रम होईल.

या ऐतिहासिक सोहळयासाठी चंद्रपूर शहर आणि बल्लारपूर शहर सज्ज झाले असून, ठिकठिकाणी होणाऱ्या शोभयात्रेसाठी स्वागत कमानी, पताका, भगवे झेंडे लावण्यात आले असून मार्गावर रामधून सुरू असून वातावरण राममय झाले आहे. आयोजनासाठी शेकडो कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने या परिश्रम घेत आहेत.

### तिरूपती मंदिराने पाठविला प्रसाद

■ तिरूपती येथील बालाजी मंदिराने १५ हजार मंदिरांचे प्रसाद लाडू भाविकांसाठी पाठविले आहेत. तिरूपती देवस्थानाला आपण सागवन काष्ठ अयोध्येच्या राम मंदिर निर्माणासाठी पाठवत असल्याचे कळविले होते. त्यानंतर त्यांनी सोहळयाला उपस्थित राहणाऱ्यांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रसाद पाठवित असल्याचे सांगितले, अशी माहिती ना. मुनगंटीवार यांनी दिली.

### स्वप्नपूर्तीचा क्षण

■ श्रीरामचंद्रांचे पिता महाराज दशरथ यांच्या मातोश्री इंदूमती या विदर्भाच्या. त्यामुळे आजीच्या भूमीतून नातवाच्या मंदिर निर्माणासाठी सागवन काष्ठ जात असल्याचा हा ऐतिहासिक क्षण असणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा स्वप्नपूर्तीचा क्षण असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले.

### नागरीकांनी पर्यायी मार्गाचा करावा अबलंब

■ शोभायात्रा महाकाली मंदिर ते शिवाजी चौक या दरम्यान असतांना नागरीकांनी भिवापुर किंवा लालपेठ जाण्यासाठी कस्तुरबा चौक-हनुमान खिडकी-भिवापुर-लालपेठ या मार्गाचा अवलंब करावा. तसेच शहरातुन बाहेर जाण्यासाठी कस्तुरबा चौक-दस्तगिर चौक-मिलन चौक-श्री टॉकीज-बिनबा गेट या मार्गाचा वापर करावा. शोभायात्रा शिवाजी चौक ते गांधी चौक या दरम्यान असतांना नागरीकांनी शहरामध्ये किंवा बाहेर जाण्यासाठी एसबीआय बँक मार्गे गोलबाजार रोडने बँक ऑफ इंडिया या मार्गाचा अवलंब करावा. शोभयात्रा गिरणार चौक पास झाल्यानंतर नागरीकांनी भिवापुर किंवा बागला चौक जाण्यासाठी हनुमान खिडकी-भिवापुर-बागला चौक या मार्गाचा वापर करावा. तसेच शहरातुन बाहेर जाण्यासाठी कस्तुरबा चौक-दस्तगिर चौक-मिलन चौक-श्री टॉकीज-बिनबा गेट या मार्गाचा वापर करावा. तसेच वरोरा नाका ते प्रियदर्शनी चौक हा मार्ग २९ मार्च २०२३ रोजी सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद राहील. दरम्यानच्या काळात पडोलीकडून शहरांमध्ये जाणारी वाहतूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज-जटपुरा गेट या मार्गाचा किंवा सावरकर चौक-बस स्टॉप-प्रियदर्शनी चौक-जटपुरा गेट या मार्गाचा वापर करतील.

# खासदार बाळू धानोरकर यांनी घेतली रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट

### सिकंदराबाद - कागजनगर पर्यंत चालणारी भाग्यनगरी ट्रेन न. १७२३३ बल्लारपूर पर्यंत चालणार



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या भांदक रेल्वे स्थानकावर हेद्राबाद - निजामुद्दिन दक्षिण एक्स्प्रेस ट्रेन नं. १२७२१/२२ व चंद्रपूर रेल्वे स्थानकावर चंदीगड - मदुराई एक्स्प्रेस ट्रेन नं. १२६८८/८७ ला थांबा मंजूर केल्याबद्दल खासदार बाळू धानोरकर यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव जी भारत सरकार यांची रेल्वे मंत्रालय दिल्ली येथे भेट घेऊन आभार मानले व इतर मागण्यांची देखील लवकरच पूर्तता करावी अशी आग्रही मागणी केली.

सिकंदराबादवरुन - कागजनगर पर्यंत चालणारी भाग्यनगरी ट्रेन. नं. १७२३३ बल्लारपूर पर्यंत सुरु करण्याची मागणी मंत्रिमहोदयांनी मान्य केली असून लवकरच याबाबतचे आदेश रेल्वे प्रशासनाला पाठविण्यात येणार असल्याचे खासदार बाळू धानोरकर यांनी सांगितले.

तसेच चांदा फोर्ट च्या पूर्वीच्या रेल्वे स्थानकाच्या रिक्त जागेत चंद्रपूर रेल्वे जंक्शन निर्माण करण्याची मागणी खासदार बाळू धानोरकर यांनी रेल्वे मंत्र्यांकडे केली. काझीपेठ पुणे एक्स्प्रेस ट्रेन नं. २२१५१/ ५२ आठवड्यातून तीन दिवस चालविणे व बल्लारपूर लोकमान्य टिळक टर्मिनल ट्रेन नं. ०११२७/०११२८ दररोज चालविण्याच्या मागणीवर देखील रेल्वे मंत्र्यांनी तिसऱ्या लाईनचे काम पूर्णत्वास गेल्यावर या मागण्या देखील पूर्ण करणार असल्याचे सांगत या मागण्यांना देखील सकारात्मक प्रतिसाद दिला.

# वीर बाबुराव शेडमाके यांचे क्रांतिकारी विचार अंगीकारा: भाग्यश्री आत्राम

**मुलचेरा / प्रतिनिधी**

सर्व गोंडीयन बांधवांनी वीर बाबुराव शेडमाके यांचे विचार घराघरात पोहोचवून त्यांचे विचार अंगीकार करा असे आवाहन माजी जि.प.अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांनी केले. मुलचेरा तालुक्यातील मल्लेरा येथील शहीद वीर बाबुराव शेडमाके यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण व कोया पुनेम पंडुम कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लेखा मेंढाचे सामाजिक कार्यकर्ते देवाजी तोफा, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती युधिष्ठिर बिश्वास, कोठारीचे उपसरपंच मनोज बंडावार, मुलचेरा नगरपंचायतचे बांधकाम सभापती काशिनाथ कन्नाके, मल्लेरा चे माजी उपसरपंच विलास गावडे, पोलीस पाटील देवाजी ओडेंगवार, पेसा ग्रामकोश समितीचे अध्यक्ष वसंत इष्टाम, चिन्ना पाटील कोवे, सेवानिवृत्त कर्मचारी मारोती इष्टाम, बाबुराव तोर्रेम, रमेश कुसनाके, कोठारी चे ग्रा.पं. सदस्य कालिदास कुसनाके, तालुका कृषी सहाय्यक रवी मडावी, भूमक, मल्लेरा येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

### मल्लेरा येथे पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण



पुढे बोलताना भाग्यश्री आत्राम यांनी वीर बाबुराव शेडमाके गडचिरोली क्षेत्राच्या इतिहासात आदिवासींच्या संघर्षाला अजरामर करून गौरवशाली प्रतिकार युद्धाची मांडणी करून गेले आहे व तो आजही वर्तमानातील शोषणाविरोधातील इथल्या संघर्षांना प्रेरणा देत आहे. त्यामुळे समाजाने त्यांचा आदर्श बाळगावा असेही त्यांनी आवाहन केले.

अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना जेष्ठ समाजसेवक देवाजी तोफा यांनी आदिवासी हाच देशाचा मूळ मालक आहे. तो वैचारिक आदर्शाचा मानबिंदू आहे. पारंपारिक संस्कृती समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी, आदिवासींचा प्रत्येक कायदा हिताचा ठरविण्यासाठी, आदिवासींचे न्याय हक्क व जबाबदाऱ्या कायम ठेवण्यासाठी आदिवासी समाजाला आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे सांगतानाच कायदेविषयक मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी गावाचा विकास करण्यासाठी ग्रामसभेने काय केले पाहिजे, वनअधिकार कायदा काय आहे, ग्रामसभेने कामकाज कसे हाताळावे, पंचायत राज म्हणजे काय ? एवढेच नव्हे तर जल, जंगल, जमिनीबाबत बोलताना त्यांनी ती आपली व्यक्तिगत प्रॉपर्टी नसून ती सामूहिक प्रॉपर्टी आहे. त्याचे जतन आपण कसे करावे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शिक्षक रमेश कुसनाके यांनी थोर पुरुष, क्रांतिकारी योद्धांचे पुतळे उभारल्याने युवा पिढीला कशाप्रकारे प्रेरणा मिळते याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

### गावात रॅली काढून मान्यवरांचे केले स्वागत

■ कार्यक्रम प्रसंगी मान्यवरांचे गावात प्रवेश होताच ढोल, ताशांच्या गजरात रेला नृत्य सादर करून गावात रॅली काढून मान्यवरांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर विधिवत पूजा-पाठ, पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण तसेच सप्तरंगी ध्वजारोहण करून उपस्थित शेकडो आदिवासी बांधवांना मान्यवरांनी संबोधित केले.

# महाराष्ट्रातील शासकीय पदे कंत्राट पद्धतीने भरतीचा शासन निर्णय तत्काळ रद्द करा : संभाजी ब्रिगेड

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी व अग्रेसर राज्य म्हणून भारतात प्रसिद्ध आहे परंतु गेले काही दिवस आपण महाराष्ट्राच्या नावारूपास काळीमा फासणारे अनेक निर्णय घेत आहात. त्यातीलच एक निर्णय म्हणजे आपण दि. १४ मार्च २०२३ तारखेला काढलेला सेवा पुरवठादार संस्थांची निवड करणारा शासन निर्णय क्रमांक काआआ-२०१३/प्र.क्र. २३३/कामगार-८ हा होय आपणास जाणीव आहेच. गेली अनेक वर्ष प्रशासनातील विविध विभागातील अनेक पदे न भरल्यामुळे बेरोजगारीचा प्रचंड मोठा उद्रेक महाराष्ट्रामध्ये आधीच उसळलेला आहे. एकीकडे विद्यार्थ्यांना मेगाभरतीच्या नावाखाली गाजर दाखवण्याचा प्रकार होत असताना दुसरीकडे आपण अशा पद्धतीचे शासन निर्णय काढून महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगारांची एक प्रकारे थट्टाच करत आहात.

अस्मानी आणि शासकीय संकटाला सामोरे जाणारा शेतकरी बाप आधीच अडचणीत असताना दुसरीकडे शेतकरी पुत्रांच्या हक्काच्या रोजगाराच्या संधी देखील आपण वरील निर्णयाच्यामुळे काढून घेत आहात. आपण काढलेला जीआर म्हणजे महाराष्ट्रातील शासकीय नोकऱ्या संपवण्याची नांदीच आहे असे आम्हास वाटते. या आपल्या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड मोठी अस्वस्थता पसरली आहे.

# चंद्रपूर येथे तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद संपन्न




**चंद्रपूर / प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, मातृ संस्था स्टापी पुणे व प्रकृती महिला विकास केंद्र चंद्रपूर द्वारा 'कम्युनिटी ?क्शन फॉर हेल्थ' या कार्यक्रमांतर्गत बुद्धिस्ट समन्वय कृती समिती सभागृह चंद्रपूर येथे तालुकास्तरीय जनसंवादाचे आयोजन करण्यात आले.

जनसंवादात पॅनल सदस्य म्हणून डॉ. श्रृंगारे सर ता.आ.अधिकारी चंद्रपूर, एम.एस.नन्नावरे आ.वि.अधिकारी चंद्रपूर, मालती सगणे राज्य निमंत्रक म.रा.आंदोलन महाराष्ट्र, डॉ.अमित जयस्वाल वै.अधिकारी प्रा.आ.केंद्र दुर्गापुर, डॉ.अनघा उंदीरवाडे वै.अधिकारी प्रा.आ.केंद्र घुग्गूस, पंकज ढेंगारे माजी पं.स.सदस्य चंद्रपूर, अविनाश आंबेकर जिल्हाध्यक्ष भ्र.नि.स चंद्रपूर, वंदनाताई जांभुळकर नगरसेविका महानगरपालिका चंद्रपूर, निलेश देवतळे जिल्हा समन्वयक, अक्षय देशमुख जिल्हा क्षेत्र पर्यवेक्षक उपस्थित होते.

सदर जनसंवाद कार्यक्रमात ग्रामस्थांनी गावातील व तालुक्यातील आरोग्य, रोजगार, स्वच्छता, शिक्षण, बांधकाम, संदर्भ सेवा, रस्ते, पाणी, बांधकाम, रिक्त पदे इत्यादी विविध विषयावरील प्रश्न उपस्थित केले.

कार्यक्रमाचे संचालन अक्षय देशमुख यांनी केले तर आभार मंगला घटे यांनी मानले. या जनसंवादाच्या यशस्वीतेसाठी शितल पाटील, अरुणा खोब्रागडे, दिक्षा ठमके यांनी सहकार्य केले. यावेळी जनसंवाद कार्यक्रमात तालुक्यातील सरपंच, ग्रा.पं.सदस्य, आशा गतप्रवर्तक, अं.सेविका, आशा वर्कर, ग्राम आरोग्य दूत, बचत गटातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ जनसंवादाचे प्रस्ताविक व भूमिका निलेश देवतळे यांनी केले, जनसंवाद कार्यक्रमाची पार्श्वभूमी अक्षय देशमुख यांनी मांडली तर डॉ. श्रृंगारे तालुका आरोग्य अधिकारी यांनी जनसंवाद कार्यक्रम प्रत्येक तालुक्यात घ्यायला पाहिजे जनसंवादातून बरेच प्रश्नाचे निराकरण होतात यामुळे नागरिकांना समाधान मिळते असे मनोगत व्यक्त केले.

# मूल वरून उपराजधानीसाठी एसटी बस नसल्याने प्रवाश्यांमध्ये नाराजी

### नागपूर बस सुरु नसल्याने सवलत कोण घेणार?



**चंद्रपूर/ प्रतिनिधी**

शिंदे-फडणवीस सरकारने महिलांना बसच्या प्रवासात ५० टक्के सवलत दिली आहे. त्यामुळे महिलांना बाहेरगावी जाण्यासाठी दिलासा मिळाला असला तरी सोबत जाणाऱ्या पुरुषांवर मात्र शासन अन्याय केल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. महिलांचा बसने प्रवासाचा कल वाढला आहे. शासनाच्या या निर्णयाने महिला वर्गात स्वागत होत आहे. मात्र स्मार्ट सिटी असलेल्या मुल नगरातून नागपूरकडे जाण्यासाठी दिवसभरात एकही बस सुरु नसल्याने सवलत असलेल्या महिला प्रवाशांना खासगी बसणे प्रवास करावा लागत आहे.

तसेच कुटुंबातील पुरुष व महिला पती पत्नी, आई-बाबा मुले, आजी- आजोबा आपल्या नातेवाईकांकडे सुख दुःखाच्या कार्यक्रमासाठी बाहेरगावी जाणे भाग पडते. परंतु महिलांना अर्धी सवलत देऊन पुरुष वर्गाकडून पूर्ण तिकीट घेत असल्याने हा शासनानेच केलेला भेदभाव असल्याने पुरुष वर्गात शासणाप्राती नाराजीचा सूर उमटत आहे. नागपूर हे उपराजधानीचे ठिकाण असून, विभागीय स्थळ आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना कार्यालयीन कामाकरिता नागपूरला जावे लागते. तर स्पर्धा परीक्षांचे जवळपास सर्वच पेपर नागपूरला होतात. त्यामुळे परीक्षार्थींचा मोठा लोंढा नागपूरला जातो. आरोग्याच्या दृष्टीने नागपूर शहर महत्त्वाचे असल्याने दुर्धर आजार किंवा गंभीर आजाराच्या उपचारासाठी सुद्धा नागपूरला जाने भाग पडते. परंतु प्रवासासाठी परिवहन आगाराची एस. टी. शासकीय बस उपलब्ध नसल्याने महिला वर्गासह प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात हिरमोड होत आहे.

■ जर तासाभराच्या फरकाने खासगी ट्रॅव्हल्स नागपूरसाठी चालत असतील तर एसटी महामंडळाची बस का चालू नये, असा संतप्त सवाल सामान्य नागरिकांनी उपस्थित केला आहे. मूलवरून नागपूरसाठी बस सेवा सुरु झाल्यास ७५ वर्षे वरील ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना याचा सर्वाधिक लाभ होणार आहे. त्यामुळे त्वरित बससेवा सुरू करावी. तसेच महिला प्रमाणे पुरुषांनाही बसच्या तिकीटात महिला प्रमाणेच ५० टक्के सवलत देण्यात यावी अशी मागणी पुरुष प्रवाशांकडून होत आहे.

# कुशल व्यवस्थापनामुळेच कोळसा उत्पादनाचे उद्दिष्ट सफल : महाप्रबंधक आबास चंद्रसिंह

## बेलोरा नायगाव खाणीतील कोळसा उत्पादनाचे उद्दिष्ट वेळेपूर्वीच पूण.

**घुग्गुस / प्रतिनिधी**
बेलोरा-नायगाव कोळसा खाणीचे खान प्रबंधक आर. के. आचार्य यांनी आपल्या कुशल व्यवस्थापनाने सर्व अधिकारी व कामगारांचे सहकार्य घेऊन वेकोलीने खाणीला दिलेले साडेबारा लाख टणाचे उद्दिष्ट वेळेच्या २४ दिवसापूर्वीच पूर्ण करून कोल इंडियाच्या इतिहासात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे .ही खान सोबतच कोल इंडियाला अभिमानास्पद बाब असून हे सर्व खाणीचे खान प्रबंधक, अधिकारी व कामगारांच्या अथकपूर्ण प्रयत्नाने पूर्ण होऊ शकले असे मत वेकोली वनी क्षेत्राचे महाप्रबंधक आबास चंद्रसिंह यांनी व्यक्त केले. उद्दिष्ट पूर्तीबद्दल वेकोलीच्या बेलोरा नायगाव कोळसा खाणीत एक भव्य कार्यक्रम घेण्यात आला त्यात ते बोलत




होते.
यावेळी मंचावर महाप्रबंधक आबास चंद्रसिंह, उपक्षेत्रीय प्रबंधक अतुल कुमार सिंह, खान प्रबंधक आर. के. आचार्य आदींची उपस्थिती होती. उप क्षेत्रीय प्रबंधक अतुल कुमार सिंह यांनी हे सर्व उद्दिष्ट पूर्ण करताना एकही अपघात घडला नाही यासाठी खान प्रबंधक व कामगारांचे आपल्या भाषणातून अभिनंदन केले व पुढेही असेच सहकार्य करण्याचे आवाहन केले. प्रथम सदर कोळसाखानीला ३१ मार्चपर्यंत दहा लक्ष टन कोळसा उत्पादनाचे उद्दिष्ट देण्यात आले होते, हे उद्दिष्ट या खाणीने ७२ दिवसा आधीच पूर्ण केले. त्यानंतर कोल इंडिया तर्फे याच कालावधीसाठी १२.५० लक्ष असे वाढीव उद्दिष्ट देण्यात आले होते ते सुद्धा खाणीने कालावधीच्या २४ दिवसांपूर्वीच पूर्ण केले. आतापर्यंत या वर्षात या खाणीने १८२ करोड रुपयाचा नफा मिळवून दिला असून मार्च अखेरपर्यंत हा नफा वाढून २०० करोड रुपये इतका होणार आहे.
हे सर्व उद्दिष्ट पूर्ण करताना उत्पादनाचा ९०३ वर दर्जा राखण्यात आला आहे .या उत्पादनासाठी खाणीतील ज्या विभागातील पथकाने आपल्या प्रत्येक पाळी मध्ये उत्कृष्ट कार्य केले अशा पथकालना ६६ हजार रुपये एवढी रक्कम वितरित करण्यात आली. यासोबतच खाणीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या १३५ कामगारांना महाप्रबंधक आबास चंद्रसिंह यांचे शुभहस्ते भेटवस्तू व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कोळसा उद्दिष्ट वेळेपूर्वीच पूर्ण करण्याची ही खाणीतील ऐतिहासिक घटना असल्याचे मान्यवरांनी म्हटले.

- उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल खान प्रबंधक आर के आचार्य यांचा येथील कार्यरत विविध कामगार संघटनांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन खान प्रबंधक आर. के .आचार्य यांनी केले तर उपस्थितताचे आभार सुरक्षा अधिकारी अनिल बोरडे यांनी मानलेत.
- या कार्यक्रमाला अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती कार्यक्रमाच्या यशस्वीते करता संकेत खोकले, सुनील बिपटे ,रोशन जोगी, जीवन मते, कृष्णा डोळस, अनुप हेपट आदींनी मोलाचे सहकार्य केले.

# सिखे संस्थेच्या पद्धतींमुळे विद्यार्थ्यांत शैक्षणिक समृद्धी : गटशिक्षणाधिकारी

## राळेगाव येथे विद्यार्थी प्रदर्शनी , दहा शाळांचा सहभाग



**भद्रावती / प्रतिनिधी**
मागील दोन वर्षांपासून सिखे संस्था भद्रावती आणि जिवती तालुक्यात कार्यरत असून सिखेच्या भाषा आणि गणित विषयाच्या शैक्षणिक पद्धती निपुण भारतचे लक्ष गाठण्यास महत्वपूर्ण असून विद्यार्थी अभिव्यक्तीस वाव देणाऱ्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी शैक्षणिक दृष्टीने समृद्ध होत आहे असे प्रतिपादन भद्रावती पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश महाकाळकर यांनी केले. डॉ. महाकाळकर आज दि.२८ मार्च रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राळेगाव येथे आयोजित विद्यार्थी प्रदर्शनीत उपस्थितांना मार्गदर्शन करतांना बोलत होते.
शिक्षण विभाग आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर तसेच सिखे संस्था मुंबई, यांच्या संयुक्त माध्यमातून सुरू असलेल्या (टीआयपी) टीचर इनोव्हेटर कार्यक्रमांतर्गत शिकलेल्या भाषा आणि गणित विषयांच्या पद्धतीच्या आधारावर विविध प्रकारचे मोडुल तयार करून इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात पाहुण्यांसमोर सादरीकरण केले. सिखे इंडिया उत्सव हा शैक्षणिक सोहळा जि.प. प्राथमिक शाळा राळेगाव येथील शाळेत घेण्यात आला. या कार्यक्रमात केंद्रातील दहा शाळेतील नव्वद विद्यार्थी, पंचवीस शिक्षक, साठ पेक्षा अधिक पालक सहभागी झाले होते.टीआयपी कार्यक्रमात भाषा आणि गणित विषयाच्या शिकविण्याच्या विविध नाविन्यपूर्ण पद्धतीचे प्रशिक्षण शिक्षकांना दोन टप्प्यात देण्यात आले,त्यानंतर शिक्षकांनी या सर्व पद्धती विद्यार्थ्यांसोबत वर्गात घेतल्या ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तरात वाढ होण्यास मदत झाली. सोबतच सिखे संस्थेने विद्यार्थ्यांना दिलेल्या कार्यपुस्तिकेमुळे विद्यार्थ्यांना सराव करण्यास अधिक संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळेत या सर्व पद्धतींवर आधारित मोडुल तयार करून कार्यक्रमात प्रदर्शित केले.

# महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना आधार प्रमाणीकरण नोंद सुरु

**मुल / प्रतिनिधी**
मुल तालुक्यातील १५ शेतकरी बांधवाना प्रेरणा ऑनलाईन जॉब वर्क्स पंचायत समिती समोरील सुविधा केंन्द्रा मध्ये आधार प्रमाणीकरण करून देण्यात आलेले आहे. संचालीका बाबरे हिने मागच्या रविवार पासून कर्जमुक्ती योजनेचा केवायसी संकेतस्थळ बंद होता आज चालू झाल्यामुळे १५ नागरीकांना आधार प्रमाणीकरण करून दिलेले आहे. उर्वरीत चौथी यादीमधील नागरीकांना जास्तीत जास्त आधार प्रमाणीकरण करावे संकेत स्थळ सुरू झालेले आहे असं सुध्दा सांगितले आहे.
सन २०१७ ते २०२० या कालावधीत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. पात्र शेतकऱ्यांची आता चौथी यादी जाहीर केली आहे, ही




यादी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड, कर्जखाते पासबुक व बचतखाते पासबुक घेऊन नजीकच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा बँकेच्या शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन आर्थिक वर्षापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांमध्ये पीक कर्जाची उचल करुन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत परतफेड केलेली आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाकडून ५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
यामध्ये प्राथमिकदृष्ट्या पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्धीसाठी बँकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या यादीमधील संबंधित शेतकऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विशिष्ट क्रमांकासह शेतकऱ्यांनी बँक कर्ज पासबुक व आधार कार्ड घेऊन बँकेच्या शाखेमध्ये अथवा आपले सरकार सेवा केंद्रामध्ये आधार प्रमाणीकरणासाठी जावयाचे आहे.

# सर्वधर्मीय सण आनंदात व शांततेत साजरे करा : जिल्हाधिकारी विनय गौडा

## शांतता समितीच्या बैठकीत पोलिस प्रशासन व नागरिकांना सुचना

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पुढील एक ते दीड महिन्यात सर्वधर्मीय सण मोठ्या प्रमाणात येत आहेत. सोबतच चंद्रपूर शहरात २७ मार्चपासून महाकाली यात्रेला प्रारंभ झाला असून बुधवारी काष्ठपुजन शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. याच काळात रमजान महिनासुध्दा सुरू झाला आहे. पुढील काही दिवसात श्रीरामनवमी, महावीर जयंती, हनुमान जयंती, गुडफ्रायडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद (ईद-उल-फित्र) हे सण साजरे होणार आहे. विशेष म्हणजे चंद्रपूर जिल्हा हा शांततेसाठी ओळखला जातो. हीच ओळख कायम ठेवण्यासाठी नागरिकांनी सर्व सण आनंदात आणि शांततेत साजरे करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.
नियोजन सभागृह येथे जिल्हा




प्रशासन व पोलिस प्रशासनाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., मनपा आयुक्त विपीन पालिवाल, उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक संजय पाटील उपस्थित होते. समाजाच्या विकासासाठी शांततेची अत्यंत गरज आहे, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, आपल्या गावाची, जिल्ह्याची तसेच राष्ट्राची कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिली तरच विकासाकडे वाटचाल होते. शांतता भंग करणे सोपे काम आहे मात्र ती कायम टिकवून ठेवणे कठीण आहे. त्यामुळेच आपल्या सर्वांवर शांतता टिकवून ठेवण्याची मोठी जबाबदारी आहे. सर्व धर्मात शांततेचाच संदेश देण्यात आला आहे. सण, उत्सव पाहून काही समाजकंटक परिस्थिती बिघडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अशांना वेळीच आळा घाला. कोणताही असामाजिक विषय मोठा होऊ देऊ नका. पोलिस प्रशासन, नागरीक आणि शांतता समितीच्या सदस्यांनी एकमेकांच्या संपर्कात राहून अशा विषयाला वेळीच निर्बंध घालावा. डीजे पथक प्रमुखांची यादी पोलिसांनी त्वरीत मिळवावी. त्यांच्याशी संपर्क करून त्यांना नियमांची जाणीव करून द्या. शहरातील जेटपूरा गेट, गिरनार चौक, गांधी चौक तसेच इतर ठिकाणीही वाहतुकीची कोंडी होणार नाही, याची काळजी घ्या. कोणतीही शहानिशा न करता आजकाल तरुणाई सोशल मिडीयावर व्यक्त होत असते. त्यामुळे नकारात्मक संदेश जाणार नाही, यासाठी प्रत्येकाने आपल्या घरातूनच जनजागृती करावी. सण, उत्सव साजरे करतांना जिल्हा प्रशासनाला सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. पोलिस अधिक्षक परदेशी म्हणाले, आपली परंपरा सर्वधर्मसमभावाची आहे. त्याचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. कोणतीही समस्या उद्भवली तर त्यातून मार्ग निघतो, यावर चंद्रपूरकरांचा विश्वास आहे. मिरवणुकीदरम्यान मुख्य रस्ते, मशीद आदींसमोर पार्किंगची समस्या निर्माण होणार नाही, याबाबत पोलिसांनी दक्ष राहावे. डीजे वाजविणाऱ्यांनी नियमांचे पालन करावे, यासाठी पथक प्रमुखांना सुचना द्या. जिल्ह्यातील सर्व पोलिस यंत्रणेने एकमेकांच्या संपर्कात राहावे.

- कोणही नॉट रिचेबल राहता कामा नये. सोशल मिडीयावर येणाऱ्या पोस्टची शहानिशा झाल्याशिवाय नागरिकांनी व्यक्त होऊ नये, अशा सुचना त्यांनी दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस उपअधिक्षक शेखर पाटील यांनी केले. संचालन आवळे यांनी तर आभार विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी कदम यांनी मानले. बैठकीला पोलिस उपअधिक्षक (गृह), यांच्यासह सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक, पोलिस पाटील आणि शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपळगाव ते कोथुळना- बोरगाव मार्गाची दैनावस्था

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
ब्रह्मपुरी तालुक्यातील पिंपळगाव-कोथळना-बोरगाव हा मार्ग प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेतून करण्यात आला होता. परंतु या रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. तसेच जागोजागी गिट्टी निघालेली आहे. तेव्हा या रस्त्याचे काम या पंधरा दिवसाच्या अगोदर डागडूगी करण्यात आलेली होती. परंतु काम बरोबर केला नसल्यामुळे पुन्हा त्या रस्त्याला खड्डे पडले व जिकडे तिकडे गिट्टी निघालेली



असल्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांना मोठा त्रास होत आहे.
या रस्त्याने शाळेत जाणाऱ्या मुली-मुले त्याचप्रमाणे कर्मचारी वर्ग, शेतकरी त्याचप्रमाणे ब्रह्मपुरीला कोणत्या कामानिमित्त जाणारे येणाऱ्या वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तेव्हा या रस्त्याकडे डागडूगी चांगल्या पद्धतीने करीत नसल्यामुळे किंवा काम करीत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे हा रस्ता पूर्ण निकुष्य दर्जाचा आहे. तेव्हा या रस्त्याकडे जनप्रतिनिधीने लक्ष द्यावे त्याचप्रमाणे संबंधित विभागाने याची दखल घेऊन हा रस्ता चांगला करावे अशी मागणी जनतेने केलेली आहे.

# ओबीसींच्या मागण्या पूर्ण करून केंद्र सरकारने ओबीसींचा सन्मान करावा : डॉ. अशोक जीवतोडे

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
ओबीसींच्या मागण्या पूर्ण करून केंद्र सरकारने ओबीसींचा सन्मान करावा. केंद्र सरकारशी संबंधित ओबीसींच्या मागण्या पूर्ण करण्याची विद्यमान केंद्र सरकार कडूनच अपेक्षा आहे, असे विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दिनांक २८ मार्च २०२३ रोजी दिल्ली येथे जंतर-मंतर मैदानावर भव्य निदर्शने करण्यात आले




आहे. ओबीसी समाजाच्या संविधानीक मागण्या केंद्र सरकारनी लवकरात लवकर सोडवाव्यात या करिता राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या माध्यमातून निदर्शने करण्यात आली. यावेळी डॉ. अशोक जीवतोडे बोलत होते.
या आंदोलनात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी ओबीसींच्या मागण्या पूर्ण करा अन्यथा खुर्ची सोडा, असे व्यक्तव्य केले. केंद्र सरकारने ओबीसींच्या मागण्या गांभीर्याने घेवून २०२४ अगोदर केंद्र शासनाशी संबंधित ओबीसींच्या मागण्या मान्य कराव्यात, असे महासचिव सचिन राजूरकर म्हणाले. यावेळी आंदोलनात राज्यसभा सदस्य बिधा मस्तान राव, राज्यसभा सदस्य बदूगुक लिंगया यादव, राज्यसभा सदस्य विधीराज रविचंद्र, राज्यसभा सदस्य मोपिदेवी वेंकटरमण, पंजाबचे इंद्रजित सिंग, दिल्ली रामगडीया संस्थेचे जितेंद्र पाल, महासचिव सचिन राजूरकर, विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे, शिव प्रसाद साहू, रजनीश गुप्ता, प्रकाश साबळे, नरेश शाहू,मध्यप्रदेश के विनय कुमार, दिल्ली के हंसराज जांगिड,चेतन शिंदे, प्रा. रविकांत वरारकर, विक्रम गौड, मधुबाला यांची उपस्थिती होती.

# परमानंद तिराणिक 'नॅब' राज्यपुरस्काराने सन्मानित

**वरोरा / प्रतिनिधी**
नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड, युनिट महाराष्ट्र नाशिक तर्फे दिव्यांग दृष्टीबाधित शैक्षणिक क्षेत्रातील महाराष्ट्राच्या विविध भागात कार्यरत असणाऱ्या व समाजामध्ये शासन स्तरावर स्वयंसेवी संस्था माध्यमातून जे डोळस शिक्षक शिक्षणाचे कार्य करतात त्यांना राज्य स्तरावर त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून सन्मानित केले जाते. अंध वा दिव्यांग संवर्गाचे विद्यार्थी कुठेही मागे पडू नये म्हणून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना प्रोत्साहित करून नवनवीन उपक्रमाची ओळख दैनिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून जोड देऊन शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शेकडो शिक्षकांचे प्रस्ताव होते. त्या सर्वांचे प्रेझेन्टेशन जिल्हा माहिती




कार्यालय अंतर्गत केल्यानंतर त्यातील नावीन्यपूर्ण प्रयोग केलेल्या शिक्षकांनी बाजी मारली. त्यात महाराष्ट्रातील एक प्राध्यापक तर चार शिक्षकांची अतिशय पारदर्शकपणे निवड करण्यात आली त्यात विदर्भातुन एकमेव चंद्रपूर जिल्ह्यातील आनंद अंध विद्यालय, आनंदवन येथील कलाशिक्षक परमानंद तिराणिक निवडीने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.
हा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटामाटात महाराष्ट्राचे लाडके ज्ञानपीठ प्राप्त कवीवर्य कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांच्या जयंती पर्वानिमित्त तसेच नॅबच्या २५व्या रौप्य महोत्सवी वर्धापनदिनानिमित्य पदम् बाबुभाई राठी, मॉंईस सभागृह नाशिक येथे कवयित्री बहिनाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. विजयजी लक्ष्मीनारायण माहेश्वरी यांच्या शुभहस्ते परमानंद तिराणिक यांचा सपत्नीक रुक्मिणी तिराणिक, शालश्रीफळ,गुलाबपुष्प , सुवर्णपदक, सन्मानचिन्ह व मानपत्र आणि रोख रक्कम पाच हजार रूपये देऊन 'राज्यस्तरीय आदर्श डोळस शिक्षक पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

- या पुरस्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी रामेश्वर कलंत्री ,अध्यक्ष नॅब महाराष्ट्र आणि उपाध्यक्ष नॅब मुंबई , मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, चेअरमन पुरस्कार समिती नाशिक, के.के वार इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरचे डीन प्रा.डॉ. कुटे, गोपी मयुर तर प्रमुख अतिथी म्हणून सिईओ प्राचार्य डॉ. आश्विनकुमार भारद्वाज, संपत जोंधळे समिती सचिव, इतिहास संशोधक प्रा.डॉ. अमिधा धुमटकर मुंबई , महाराष्ट्रातील पहिली दृष्टीबाधित जिल्हाधिकारी प्रांजल कोमलसिंग पाटील, यांची उपस्थिती होती. यावेळी पुरस्कार वितरण सोहळा व तेजोमयी प्रवास स्मरणिकातील पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या विशेष कार्य गौरवासाठी आदर्श असलेल्या प्राध्यापक, शिक्षक व संस्था यांच्या यथोचित सन्मानाप्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस,.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना. एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा पंत्रांचे वाचन करण्यात आले..

# कोदेपूर सोसायटी युतीच्या ताब्यात



**जिवती / प्रतिनिधी**
तालुक्यातील महत्वाची मानल्या जाणाऱ्या आदिवासी सेवा सहकारी संस्था मर्यादित कोदेपूर सोसायटी ची निवडणूक दि. २५ मार्च ला पार पडली त्यात गोंडवाना गणतंत्र पार्टी, भाजप, शेतकरी संघटनेच्या युतीने कोदेपूर सोसायटी वर आपला झेंडा फडकवला. मागील अनेक वर्षा पासून काँग्रेस च्या ताब्यात असलेल्या या सोसायटी वर युतीने आपले १३ ही उमेदवार विजयी करत आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. गोंडवाना गणतंत्र पार्टी, भाजप, शेतकरी संघटना युतीचे निवडून आलेल्या संचालकांमध्ये निशिकांत रेशमाजी सोनकांबळे, महेश बळीराम देवकते, मारोती झाडू कोडापे, रामू मारोती कोडापे, लक्ष्मण मानकु गेडाम, सोनेराव कान्हू पेंदोर, चेनराव सोमू मडावी, आनंदराव जंगू शेडमाके, राम गोविंद चव्हाण, दत्तात्रय केरबा कांबळे हे विजयी झाले. निवडणुकीत युतीच्या दोन जागा बिनविरोध निवडून आल्या त्यात रमेश दत्ता पुरी, जैतूबाई बापूराव कोडापे यांची बिनविरोध निवड झाली. ही निवडणूक माजी आमदार वामनराव चटप, माजी आमदार संजय धोटे आणि गोंडवाना गणतंत्र पार्टीचे युवानेते गजानन पाटील जुमनाके यांच्या नेतृत्वात लढविण्यात आली. निवडून आलेल्या संचालकांचे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक पांडुरंग जाधव, माजी सभापती भीमरावजी मेश्राम, नगरसेवक ममताजी जाधव, गोंडवाना गणतंत्र पार्टीचे जिवती तालुकाध्यक्ष हनुमंत कुमरे, भाजप तालुकाध्यक्ष केशव गिरमाजी, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष रमेश पुरी यांच्यासह जिवती तालुक्यातील युतीच्या कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.